गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ८७ वा | बुधवार १४ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 87 | Date : 14/08/2024 | blow Wednesday | Page 4 Price 4

# आता नगराध्यक्षांचा कालावधी पाच वर्षे

## राज्याच्या मंत्रिमंडळात आठ महत्त्वाच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब!

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. पशूसंवर्धन व दुग्धविकास, महसूल विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सहकार विभाग आदी विविध विभागासाठी निर्णय घेण्यात आले. सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे नगराध्यक्षांचा कालावधी पाच वर्षे करण्यात आला आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणार असून यासाठी १४९ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. तर महसूल विभागात मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना राबवण्यात येणार असल्याचे या मंत्रिमंडळ बैठकीत निश्र्चित करण्यात आले आहे.



सहकार विभागांतर्गत यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्यात आली आहे. तर वैद्यकीय शिक्षण विभागात शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापाकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातून सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात येणार असून यासाठी सुधारित ३७ हजार कोटी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसंच, नगरविकास विभागांतर्गत नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, ऊर्जा विभागात सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्यात आला आहे.

राज्यात एकूण २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायत आहेत. निवडून आलेल्या । पान २ वर

# जिल्ह्यात अन्नपूर्णा योजनेंतर्गत पात्र कुटुंबाना मिळणार वर्षाला मोफत ३ गॅस सिलेंडर

## निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार

*** प्रधानमंत्री उज्वला योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना प्रति सिलेंडर ८३० रुपये अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार**

*** जिल्ह्यात ८९ गॅस वितरक कार्यरत आहेत, ज्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी झाले नाही त्यांनी संबंधित गॅस वितरक यांच्याकडे जाऊन ई केवायसी करण्याचे आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य शासनाने दि. ३० जुलै २०२४ रोजी मुख्यमंत्री अन्नपुर्ण योजना अंमलात आणली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील प्रधानमंत्री उज्वला योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व गॅस वितरकांनी त्यांच्याकडे नोंद असलेल्या परंतु इ केवायसी न झालेल्या महिलांचे ई केवायसी त्वरित करून घ्यावे, असे निर्देश उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात या योजनेच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत श्रीमती कुंभार बोलत होत्या. यावेळी जिल्ह्यातील HPCL BPCL IOCL यांच्या सेल्स ऑफिसर व जिल्हा महिला बालविकास अधिकारी आर.बी. काटकर, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे उपस्थित होते.

या योजनेंतर्गत पात्रा लाभार्थ्यांना वर्षातून ३ गॅस सिलेंडर रिफिल मोफत मिळणार आहे. त्यासाठी लाभार्थ्यांनी आगोदर स्वखर्चाने गॅस सिलेंडर रिफील करावे व त्यानंतर । पान २ वर

# श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस भाविकाकडून १ लक्ष रुपयाची देणगी



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुणे येथील भाविक विठ्ठलराव बाबुराव मेंदनकर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस १ लक्ष १११ रुपयाची देणगी दिली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे लिपिक योगेश कागदे व देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.

# जलशक्ती अभियानाचे नोडल अधिकारी राकेश कुमार मीना यांच्याकडून जिल्ह्यातील कामाची पाहणी

## सोलापूर जिल्ह्याचे अमृत सरोवर मधील काम उत्कृष्ट असून अशाच पद्धतीत ने अन्य कामे करण्याचे आवाहन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात जलशक्ती अभियाना अंतर्गत नारीशक्तीचे जलशक्ती हे ब्रीद घेऊन मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाचे कामे करण्यात येणार आहेत त्या अनुषंगाने विविध कामाचा संपूर्ण जिल्ह्याचा एक शास्त्रीय पद्धतीने आराखडा सादर करण्याबाबत केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना यांनी जलसंधारण विभागाला सुचित केलेले आहे. आज श्री मीना यांनी पोखरापूर येथील रिचार्ज शॉफ्ट, खवणी येथील नाला खोलीनीकरणाचे काम, सोलापूर शहरातील सिद्धेश्र्वर वनविहार मियावाकी पद्धतीचे वृक्ष लागवड काम तसेच सोलापूर शहरातील फ्लोरा हाऊसिंग सोसायटीच्या रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर चे काम या सर्व कामाची पाहणी करून अनुषंगिक मार्गदर्शक सूचना दिल्या. जिल्ह्यात जलसंधारण विभागांने अमृत सरोवर योजनेअंतर्गत दिलेल्या ७५ । पान २ वर



# शरद पवारांनी मराठा समाजाचे वाटोळे केले; मनोज जरांगेंचं टीकास्त्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

राहाता : शरद पवारांनी मराठा समाजाचे आजवर वाटोळे केले. त्यांनी सुचवलेला पन्नास टक्क्यांवरील आरक्षणाच्या मार्गाशी आमचा संबंध नाही. तो त्यांनीच कसा देता येईल याबद्दल स्पष्ट करावे, अशा शब्दांत मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले. पवारांना आजवर जमले नाही म्हणून तर आम्ही तुमच्याकडे मागत आहोत, असे सांगत त्यांनी महायुतीला विचारणा केली आहे.

जरांगे यांच्या शांतता रॅलीचे सोमवारी रात्री उशिरा शिर्डीत आगमन झाले. आज मंगळवारी सकाळी नाशिकला जाण्यापूर्वी जरांगे यांनी साई समाधीचे । पान २ वर






दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि.१४ ऑगस्ट २०२४ 

## संपादकीय

### इतकी गरज आहे.

चांगला माणूस होण्यासाठी दुसरा पर्याय नाही. अवचित प्रसंगी मित्र-मैत्रिणी खचून जाऊ शकतात. तेव्हा त्यांना साथ द्या. कठीण प्रसंगात एकमेकांची साथ सोडू नका. समाजात वावरताना कान आणि डोळे नेहमी उघडे ठेवा. त्यासाठी समाजभान जागृत ठेवण्याचा सल्ला प्रसिद्ध अभिनेता सुमित राघवन यांनी दिला आहे. संवेदना, सामाजिक बांधिलकी, सहवेदना, सहचर्य, मदतीची भावना ही माणसाची काही वैशिष्ट्ये. तथापि त्यांची वीण विसविशीत होत चालल्याचे अनुभव समाज घेतो. अलीकडच्या काळात अशा घटनांमध्ये वाढ होत चालल्याचे आढळते. समाजात घडणाऱ्या अनेक अनावस्था आणि कटू प्रसंगांमध्ये अनेक लोक 'बघ्याची' भूमिका घेताना आढळतात. अपघात घडतात. त्यातील जखमी मदतीच्या प्रतीक्षेत असतात. रस्त्यावर मारामाऱ्या होतात. मुलींची छेड काढली जाते. प्रेमप्रकरणातून त्यांच्यावर हल्ल्याच्या घटना घडतात. अशा प्रसंगांमध्ये क्वचितच माणसे मदतीला धाव घेताना आढळतात. त्याऐवजी प्रसंगाचे मोबाइलवर चित्रीकरण करण्यात मात्र आघाडीवर दिसतात. सामान्य माणसे मदतीला धाव का घेत नसावीत? त्याचीही काही कारणे असू शकतील का? प्रसंग अपघाताचा असला तरी न्यायालयाच्या किंवा पोलीस स्थानकांच्या चकरा माराव्या लागतील, मारामाऱ्या सोडवायला गेले किंवा छेड काढणाऱ्यांना हटकले तर मध्यस्थी करणाऱ्यालाचे मारहाण होऊ शकेल, अशी भीती सामान्य माणसांना वाटते. तशा घटना घडल्याही आहेत. पण विरोध करायला एक जरी व्यक्ती पुढे आली तर त्याची साथ द्यायला पुढे येण्याची हिंमत माणसांमध्ये येऊ शकते, हे काही प्रसंगांनी अधोरेखित केले आहे. सामाजिक मदतीच्या गरजेची वेळ प्रत्येकावर कधी ना कधी येते. अशावेळी आजूबाजूच्या णसांनी मदतीसाठी धाव घ्यावी, अशी सर्वांचीच अपेक्षा असते. तथापि मदतीची सुरुवात स्वतः पासून करणे आवश्यक आहे याचा मात्र माणसांना विसर पडला असावा का? मला काय त्याचे, अशी अलिप्ततेची किंवा मदतीसंदर्भात भीतीचीच भावना प्रत्येकाच्या मनात असली तर मदतीसाठी कोण धावेल, याचाही विचार केला जाऊ शकेल का? अन्यथा मदतीला कोणीच पुढे येत नाही असा दोषारोप होतच राहील. सामाजिक वेदना जाणवण्यासाठी प्रत्येकाने चांगला माणूस होणे गरजेचे आहे, हेच राघवन यांना सुचवायचे असावे. ज्याची समाजाला कधी नव्हे इतकी गरज आहे.

# एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने हिरक महोत्सवी ६० वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

छत्रपती संभाजी नगर : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ८ व ९ आगष्ट १९३० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत संदेश दिला होता की, एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे. मात्र सद्यस्थितीत १ आगष्ट २०२४ ला सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या अनुषंगाने संवैधानिक प्रवर्गाचे उप वर्गीकरण करण्याच्या अनुकूल निर्णय दिला आहे. म्हणून संदर्भीय विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ- : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६० व्या हिरक महोत्सवी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ११ आगष्ट २०२४ ला क्रांतीबा ज्योतीबा फुले सभागृह, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. डी. व्ही. खिल्लारे म्हणाले की, २६ नोव्हेंबर १९४९ ला स्वीकारलेल्या भारताचे संविधानाची सुरूवात ही आम्ही भारताचे लोक अशी करून परस्परांमध्ये मैत्री भाव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला गेला असल्याने आपण एकसंघ आहोत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात न्याय नसल्याने समाजाच्या विकासासाठी फारसा उपयोग होणार नाही. आरक्षणाचे लाभार्थी न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरच्या बाजूने निकाल द्यावे, यापेक्षा मोठी शोकांतिका काय असू शकेल? करिता या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी संसदेने अमेंडमेंट बील आणले पाहिजे. याप्रसंगी प्रमुख वक्ते सिद्धार्थ शिनगारे म्हणाले की, देशातील पाच राज्यात एससी च्या वर्गीकरणाचे प्रयत्न झाले आहेत. मुळात एस. सी. प्रवर्गाचे उपवर्गीकरण होऊ शकेल काय? एस.सी. मध्ये अंतर्भूत घटकांचा एकजिनसी समाज तैयार होऊ शकेल काय? ३४१ मध्ये अंतर्भूत तरतूदीचा उपयोग होऊ शकेल. मात्र न्यायमूर्ती बी. आर. गवई सारखी माणसे कु-हाडिचा दांडा गोतास काळ ठरत असल्याने त्यांनी एकजिनसीपणा नाकारून उपवर्गीकरण व क्रीमी लेअर लागू करण्याचे तत्व मान्य केले ज्याला इतरांनी समर्थन दिले. आरक्षणाने जातीवाद वाढतो असे म्हणणारे भारताचे संविधान लागू होण्यापूर्वी या देशात जातीवाद नव्हता काय? यावर कुणी बोलायला तयार नाहीत. कारण ब्राह्मणवाद्यांकडे न्यायिक चरित्र नसते. उलटपक्षी या निर्णयात नेहरूंनी त्यांच्या कार्यकाळात आरक्षणाची अंमलबजावणी करू नये. असे आदेश दिल्याचे पत्र जोडले गेले आहे. अशा परिस्थितीत देशातील एक कोटी



आरक्षण वाद्यांनी निर्णयाचे विरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे. कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना प्रसिद्धी दिली आहे. मुळात पंजाब राज्य आणि इतर विरूद्ध दविंदरसिंग आणि इतर ही २०११ ची २३१७ क्रमांकाची फिर्याद आहे. त्यानंतरच्या काळात तशा प्रकारच्या २२ फिर्यादी दाखल करण्यात आल्या त्या सर्व केसेस एकत्रित करून सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्याचा प्रयत्न केला आहे. यात अनुसूचित जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण केले जाऊ शकते काय? तो प्रवर्ग एकजिनसी आहे काय? हे ठरवीत असताना प्रवर्ग एकजिनसी नसल्याचे मान्य करून उपवर्गीकरण केले जाऊ शकते असा निर्णय दिला आहे. ज्यात सर्व प्रवर्गात उपवर्गीकरण करून क्रिमी लेअर लागू करण्याचा सल्ला दिला आहे. ज्याचे दूरगामी परिणाम आरक्षित समूहांवर होणार आहेत. मूळात भारताचे संविधानातील तरतुदीनुसार संपूर्ण आरक्षणाची अंमलबजावणी करून समग्र नागरिकांना मुख्य प्रवाहात सामील केले पाहिजे. ज्यासाठी सायमन कमिशनच्या शिफारशीवर आणि गोलमेज परिषदेत प्रतिनिधी पाठविण्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ व ९ आगष्ट १९३० ला नागपूर येथे अखिल भारतीय दलित वर्ग परिषद भरविण्यात आली होती. ज्यात एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे. असे ठणकावून सांगितले होते. करिता भारताचे संविधानात सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयासाठी तरतूदी अंतर्भूत केलेल्या आहेत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकसंघ भारताचे पाहिलेले स्वप्न भंग करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरण व क्रीमी लेअर लागू करण्याचा सल्ला दिला आहे. ज्यामुळे क्रीमी लेअर मधून क्रिम काढून लेअर ठेवतांना उपवर्गीकरणाद्वारे लेअरची संख्या वाढविली जाईल. मात्र रोस्टर मध्ये त्यांचा क्रमांक खालच्या तळावर गेल्याने अप्रत्यक्षपणे मागासवर्गीयांना संधीच नाकारली जाईल. क्रीमी लेअरच्या अटीमुळे आवश्यक न्यूनतम पात्रता धारक संधी रेषेच्या बाहेर फेकले जातील व ज्यांच्याकडे न्यूनतम पात्रता नाही त्यांना संधी दिली, तरी फायदा घेता येणार नाही. अशाप्रकारे उपवर्गीकरणाद्वारे मागासवर्गीयांना अप्रत्यक्षपणे संधी नाकारून खुल्या प्रवर्गातील उच्चभ्रूंना संधी उपलब्ध करून दिली जाईल. हे त्यांच्या लक्षात येऊ नये म्हणून त्यांना आपआपसात लढण्यासाठी भाग पाडले जात आहे. परिणामी मैत्री भावनेने विविध प्रवर्गातील माणसे एकत्र येण्याऐवजी परस्परांपासून दूर जाऊन प्रस्थापितांचे गुलाम होऊन ओझे वाहतील.

या केसच्या सबमिसन मध्ये कपिल सिब्बल यांनी आपले म्हणणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संदर्भ देऊन स्पष्ट केले आहे की, आर्टिकल ३४१ प्रमाणे शेड्युल्ड कास्ट च्या यादीत कोणते नांव काढायचे किंवा टाकायचे यासाठी राजकीय घटकांच्या उपद्रवापासून दूर ठेवले पाहिजे. जे अधिकार संसदेला आहेत. ज्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाला मान्यता देणे आणि आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयासाठी तरतूद केली असल्याने आर्थिक आधारावर क्रीमी लेअरला मान्यता देणे म्हणजे भारताचे संविधानातील तरतुदींची पायमल्ली करण्यासारखे आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकसंघ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाचा पुनर्विचार केला पाहिजे. अन्यथा याला पायबंद घालण्यासाठी संसदेने महाभियोग चालविला पाहिजे जेणेकरून भारताचे संविधानातील तरतुदींची पायमल्ली करण्याचा कुणीही प्रयत्न करणार नाहीत. भारताचे संविधान हा या देशातील जनतेचा प्राण आहे. जनतेच्या प्राणाचे बलिदान दिल्याने एकसंघ भारताचे स्वप्न धोक्यात येईल. तसे होऊ नये म्हणून आपण या महत्वपूर्ण ज्वलंत विषयावर चर्चा करीत आहोत.या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने, प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला प्रदीप मेश्राम, लोकेश मेश्राम, संकेत चव्हाण, तेजल गवई, दिगंबर मण्यार, एड. डी. व्ही. खिल्लारे, सुभाष वानखेडे, अरुण इंगळे, भिमराज बोर्डे, समाधान ओंकार इंगळे, डॉ. मोहन सौंदर्य, सिद्धार्थ शिनगारे, सुदर्शन शिरसाठ, अनुपम गोडघाटे, नोमान खान, देवकांत मेश्राम, रंजीत म्हस्के, आकाश रामटेके, धनराज गोंडाणे, स. सो. खंडाळकर, बी. बी. मेश्राम, एड. आर. टी. खंदारे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे गोविंद कांबळे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

### आता नगराध्यक्षांचा कालावधी

नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच अडीच वर्षे दोन अध्यक्ष निवडले जातात. त्यानुसार, दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांवरून पाच वर्षे करण्यात आला आहे. त्यातच काही नगरपालिकांमध्ये प्रशासन राजवट लागू असून तेथील निवडणुका लागणे बाकी आहे. यामुळे आता राजकीय वातावरण पेटण्याची शक्यता आहे. यावर आता अनेक प्रतिक्रियाही येण्याची शक्यता आहे.

### जलशक्ती अभियानाचे नोडल

सरोवर दुरुस्तीच्या कामाव्यतिरिक्त खूप मोठ्या प्रमाणावर कामे करून अनेक जुनी सरोवरे पाणी साठवण योग्य केलेली आहेत. त्यातील अनेक कामांची पाहणी केंद्रीय नृढ अधिकारी श्री मीना व केंद्रीय तांत्रिक अधिकारी श्रीमती पुर्णिमा बाराहाते यांनी करून या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. याच पद्धतीने सर्व जलसंधारणाचे कामे पूर्ण केल्यास सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जलसंवर्धन होऊन पुढील काळात हा जिल्हा जलयुक्त होण्यास मदत होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या पाहणी दौऱ्यात जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा व जलसंधारण विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

### जिल्ह्यात अन्नपूर्णा योजनेंतर्गत

लाभार्थ्यांच्या बँक खात्यात शासनाचे गॅस कंपनीकडून अनुदान वर्ग करण्यात येणार आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील खालील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मुख्यमंत्री उज्वला योजना लाभार्थी संख्या १ लाख ६९ हजार ३४, गॅस सिलेंडर रिफील किंमत ८३०, (अनुदानाचे स्वरूप ३०० रूपये केंद्र सरकार व ५३० राज्य सरकार). मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये ५ लाख ८६ हजार ५०९ लाभार्थी पात्र ठरले आहेत. सदर पात्र लाभार्थ्यांचा डेटा पडताळणी करून महिलांचे नावे गॅस कनेक्शन असणाऱ्या लाभार्थ्यांना ही मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेचा लाभ मिळणार आहे.

प्रधानमंत्री उज्वला योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेचा लाभ घेणेकामी संबंधित लाभार्थी यांनी आपली ई-केवायसी पूर्ण करणे अपेक्षित आहे. जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्वला योजनेची ई-केवायसी बाबत माहिती प्रधानमंत्री उज्वला योजना-१ लाख ६९ हजार ०३४ लाभार्थी संख्या आहे तर ई-केवायसी प्रक्रिया पुर्ण झालेले लाभार्थी-६८ हजार ३९६ इतके आहेत, पुर्ण ई-केवायसी टक्केवारी- ४०.४६%, ई-केवायसी प्रक्रिया शिल्लक असलेले लाभार्थी १,००,६३८, शिल्लक ई-केवायसी टक्केवारी ५९.५४%.

सोलापूर जिल्ह्यात क्ष्ज्ञउङ कंपनीचे १६ गॅस एजन्सी, खजउङ कंपनीचे २० गॅस एजन्सी, इझउङ कंपनीचे ५३ गॅस एजन्सी असे एकूण ८९ गॅस एजन्सी कार्यरत आहेत. आजच्या आढावा बैठकीत क्ष्ज्ञउङ कंपनीचे सेल्स ऑफीसर सागर चव्हाण, इझउङ कंपनीचे सेल्स ऑफीसर रघु कुमार उपस्थित होते.

या बैठकीत शिल्लक असलेले ई-केवायसी प्रक्रिया तात्काळ पुर्ण करून घेणेबाबत गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांना निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर यांनी सूचित केले आहे. तसेच ई-केवायसी प्रक्रिया शिल्लक असलेले लाभार्थ्यांनी गॅस एजन्सीत जाऊन माहे ऑगस्ट - २०२४ अखेर ई-केवायसी पुर्ण करून घ्यावी अन्यथा लाभार्थ्यांना लाभ देणेस अडचण उदभवु शकते. ई-केवायसी प्रक्रिया लाभार्थ्यांना आपल्या गॅस एजन्सी मार्फत करता येणार असून ते पुर्णपणे मोफत करण्यता येणार आहे. तरी याबाबत लाभार्थ्यांना काही अडचण असल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, सोलापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

### शरद पवारांनी मराठा समाजाचे

दर्शन घेतले. यानंतर पत्रकारांशी बोलताना जरांगे यांनी पवारांवर वरील टीका केली. पवार यांनी काल ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण दिल्याशिवाय मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. आरक्षणाची टक्केवारी वाढवणे हाच त्याला मार्ग असून त्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सहकार्याची भूमिका जाहीर केली आहे. पवारांच्या या विधानाचा संदर्भ देत जरांगे यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. जरांगे म्हणाले, की मराठा आरक्षणाचा हा प्रश्न अगोदरच्या सरकारांनी देखील भिजत ठेवला. महाविकास आघाडीतील पक्षांनी याबाबत काहीही केले नाही. विशेषत: पवारांनी देखील या प्रश्नावर काही न करता समाजाचे वाटोळे केले. परंतु हे पक्ष असे वागले म्हणून तर मराठा समाज महायुतीकडे आरक्षण मागतो आहे. पण तुम्हीही तसेच वागत आहात. साधे मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेऊ असे म्हटले होते. पण आज ११ महिने झाले. तरी संपूर्ण गुन्हे मागे घेतलेले नाहीत. या वेळी जरांगे यांनी महायुतीतील मराठा नेते नारायण राणे, राधाकृष्ण विखे, प्रवीण दरेकर यांच्यावरही टीका केली

# संस्काराची खळाळणारी नदी म्हणजे साहित्य : डॉ.बाळासाहेब गुंजाळ



निफाड/प्रतिनिधी :लेखक होता नाही आले तरी चालेल पण उत्तम वाचक आणि रसिक व्हा. जीवनात साहित्य वाचनाचा छंद जोपासा यातून जीवन जगण्याची नवी वाट मिळते, अगदी साधे वाक्य, काव्य किंवा म्हणीमध्येही जीवनाचा सार सापडतो. कुकू मिळल पण माटी मिळणार नाही. या म्हणीत कृषी संस्कृतीचे ज्ञान दडलेले आहे. ज्या घरात पुस्तके व वाचन नाही ते घर पैसे असूनही गरीबच ठरते म्हणूनच ग्रंथ आणि ग्रंथालये यांच्याशी मैत्री करा असे आवाहन डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांनी केले.

क ग दा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे आयोजित वाड.मय मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रमुख प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

पुढे त्यांनी साहित्याचे प्रकार व त्यातील प्रत्यक्ष प्रसंग सांगत निरोगी आणि प्रबळ मनाला दिशा देऊन इच्छित यशप्राप्तीसाठी वाचनाचे फायदे उदाहरणातून स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेशजी जाधव यांनी तरुण पिढी ही वाढत्या मोबाईलच्या वापराने अस्वस्थ झाली असून, नकारात्मकता आणि अकार्यक्षमतेकडे झुकली आहे असे मत व्यक्त केले, यावर उपाय म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, तुमच्याकडे २ रुपये असतील तर १ रुपयाचे पुस्तक घ्या आणि १ रुपयाची भाकरी ... यानुसार आजच्या तरुणाईने वाचनात रममाण व्हावे असे प्रतिपादन डॉ जाधव यांनी केले. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कु. समाधान वैष्णव आणि कु. आदित्य बर्वे यांनी भक्तीगीत व गुरूवंदन गायीले. प्रास्तविक डॉ. सुनिता उफाडे व डॉ सुजाण लोरन्सिया यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन प्रा. महेश बनकर यांनी केले तर आभार श्रीमती सीमा तायडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. सुरेखा जाधव, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. महेंद्र पवार, श्रीमती वैशाली गीते, डॉ. बी. सी. आहेर, व सर्व प्राध्यापक वृंद आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# औसा विधानसभेतून दिनकररावजी माने यांचे संभाव्य विधानसभा यादीमध्ये नाव

औसा/अमर जाधवः औसा विधानसभेतून महाविकास आघाडीचे सन्माननीय नेते दिनकररावजी माने यांचे संभाव्य विधानसभा यादीमध्ये नाव आले असुन जवळजवळ औसा विधानसभेतून लोकनेते सन्माननीय दिनकररावजी माने यांचे नाव निश्रि्चत झाले आहे.

राजन साळवी व लोकनेते सन्माननीय दिनकररावजी माने या दोघांची नावे विधानसभेसाठी पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून जाहीर केल्याचा व्हिडिओ सुद्धा व्हायरल होत आहे .

तेव्हा कार्यकर्त्यांनी कामाला लागा उमेदवारी निश्रि्चत झालेले आहे आपला उमेदवार किती मताधिक्याने विजयी होईल आणि लाल दिवा आपल्या उमेदवाराला कसा भेटेल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे असी चर्चा आता कार्यकर्ते करत आहेत कार्यकर्त्यांनो कामाला लागा उमेदवार आपलाच आहे गुलाल आपलाच आहेआसेच आता चौकाचौकात बोलले जात आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अजितदादांवर टीका करण्याची महिबूब शेख यांची पात्रता नाही : श्रीकांत शिंदे

## प्रदेशाध्यक्ष पद वाचविण्यासाठीच अजितदादांवर टीकेचा केविलवाणा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात २ गट पडल्यानंतर लोकसभा निवडणूक झाली आता विधानसभा निवडणूकीचे वेध सर्वांना लागलेले आहे. असे असताना शरदचंद्र पवार यांच्या गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष महिबूब शेख यांनी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्यावर टीका केलेली आहे. ज्याने काकाचे ऐकले नाही तो पुतण्या लोकसभेत गेला असे म्हणत गुलाबी कलरवरून देखील अजितदादांवर टीका केली असून विधानसभेला अजितदादांची अवस्था तेलंगणाच्या केसीआर यांच्याप्रमाणे होईल अशी टीका कैलेली आहे या टीकेला आता अजितदादांचे समर्थक व राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी सडेतोड उत्तर दिलेले आहे.

श्रीकांत शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देवून आपण शिवसूराज्य यात्रा काढत असताना छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचावे उगाच गर्दी समोर दिसते

अन स्वतः चे महत्व वाढवण्यासाठी हे समजायला.मार्ग नाही. अजितदादांवर टीका करण्याएवढी महिबूब शेख यांची पात्रता नाही त्यांची राजकीय उंचीदेखील तेवढी नाही. राष्ट्रवादीत प्रत्येक ३ वर्षाला नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते मात्र महिबूब शेख हे युवक प्रदेशाध्यक्ष म्हणून गेल्या ८ वर्षांपासून प्रदेशाध्यक्ष पदाला चिकटून बसलेले आहेत. अनेक सक्षम युवक नेते असताना देखील त्यांना पदावर येवू दिले नाही. त्यांना पद सोडू वाटत नाही त्यामुळे वरिष्ठांना खूष करण्यासाठी दुसऱ्या नेत्याचे ऐकून अजितदादांवर टीका करण्याचे काम महिबूब शेख यांनी केले आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील काही नेते हे स्वत: पुढे येवून अजितदादांवर टीका करण्याचे धाडस नसल्याने महिबूब शेख यांच्यासारख्या स्वत:च्या बीड जिल्ह्यातील आष्टी मतदारसंघात ताकद नसलेल्या नेत्याला पुढे करून टीका करत आहेत.

लोकसभेला महायुतीकडून भाजप नेत्या पंकजा मुंडे विरूध्द महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे बजरंग सोनवणे यांच्यात सामना झाला त्यावेळी महिबूब शेख आपण आष्टी विधानसभेतील ज्या पिंपळनेर गावात राहता त्या ठिकाणी एकाही बुथवर ५० मते देखील मिळवून देता आली नाही त्यावरूनच गावात किती पात्रता आहे व त्यांना लोक किती किंमत देतात हे दिसून येते. केवळ गोड गोड बोलून वरिष्ठांना खुश करण्यापेक्षा दुसरे काहीही काम महिबूब शेख यांना येत नाही. ज्या मतदारसंघात आपण राहता एक राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून आपली नैतिक जबाबदारी आहे की किमान आपल्या मतदारसंघात तरी आपल्या तुतारीच्या उमेदवाराला मताधिक्य देणे हे अपेक्षित होतं पण आपल्या बुथमध्ये सुद्धा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना लीड देऊ शकला नाही खऱ्या अर्थाने त्याच ठिकाणी आपली नैतिक जबाबदारी म्हणून आपण प्रदेशाध्यक्ष पदाचा मोठ्या मनाने राजीनामा द्यायला पाहिजे होता पण तेवढी ही नैतिकता आपल्याजवळ नाही त्यामुळे आपण विकासपुरुष असलेल्या आदरणीय अजितदादांवर बोलताना जरा विचार करून बोलावे कारण आपल्या नेत्यांचे शब्द आपल्या तोंडून बाहेर पडतात हे न समजण्याइतके राजकारणात कोणी लहान राहिले नाही.

अजितदादांची के चंद्रशेखर राव यांच्यासारखी परिस्थिती होईल यावर भविष्यवाणी करण्यापेक्षा प्रदेशाध्यक्ष पदावरून एकदा पायउतार झाले नंतर आपण आपला राजकीय प्रवास काय असेल याचा विचार अन अभ्यास केला तर बरे होईल. कारण अजितदादा हे अजित दादा अन राजकीय पटलावर त्यांचे स्थान त्यांनी निश्रि्चत केले आहे काका सोबत असतानाही काका शिवाय ही त्यामुळे तुम्ही अजित दादांवर बोलण्याईतके अजून एवढे मुरब्बी राजकारणी झाला नाहीत

राष्ट्रवादी युवक काँग्रेस मध्ये जेपी गट व अजित दादा गट ही सुरुवात आपण केली अजितदादा गटाच्या कार्यकर्त्याला कायम दुय्यम स्थान जयंत पाटील साहेब यांना मानणाऱ्या कार्यकर्त्याला अग्रस्थानी हे असले राजकारण आपण सुरू केले असे अनेक गोष्टी आहेत म्हणून झाकली मूठ सव्वा लाखाची ती झाकलेली राहू द्या असे म्हणत श्रीकांत शिंदे यांनी खडेबोल सुनावले आहेत.

विशेष म्हणजे राष्ट्रवादी एकसंघ असताना महाबळेश्र्वर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शिबिरामध्ये आदरणीय पवार साहेबांनी एक सल्ला दिला होता राजकारणात कोणी खुर्ची देत नसते ती खुर्ची हिसकावून घ्यावी लागते पण आदरणीय पवार साहेब अजित दादांना खुर्ची द्यायला तयार होते पण साहेबांच्या जवळील काही ठराविक नेत्यांचा त्या गोष्टीला विरोध होता म्हणूनच अजितदादांनी पवार साहेबांच्या शब्दाचा विचार करून स्वतःहून आपली जागा आणि खुर्ची तयार करून घेतली अजितदादांवर टीका करून आपण जरूर काही नेत्यांच्या नजरेत आपली प्रतिमा चांगली करण्याचा प्रयत्न करत असाल पण शेवटी काका आणि पुतण्या यांचे राजकारण तुम्हाला आत्ताच कळणार नाही योग्य वेळी योग्य निशाणा साधण्याची किमया अजितदादांमध्ये आहे एकदा आपण प्रदेशाध्यक्ष पदावरून पायउतार झाल्यानंतर आपल्याला महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर काय स्थान आहे हे समजून येईल,अशी टिका श्रीकांत शिंदे यांनी महिबूब शेख यांच्यावर केलेली आहे.

# बस स्थानक परिसरातील घाणीचे साम्राज्य पाहून आमदार समाधान आवताडे संतापले; अधिकाऱ्यांना घेतले फैलावर




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी आणि दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या पंढरपूरला दरवर्षी लाखो भावी आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी येत असतात. शेतकऱ्यांचा देव अशी ओळख असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येणारा भाविक बहुतांश एसटी बसने प्रवास करतो. आपल्या गावावरून पंढरपूरला उतरल्यानंतर त्या भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्या आणि बस स्थानक परिसरात स्वच्छता असावी ही माफक अपेक्षा या भाविक प्रवाशांचे असते.

मात्र पंढरपूर बस स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छ पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. बस स्थानक परिसरात जागोजागी घाण व कचरा साठलेला आहे. याबाबत अनेक माध्यमातून बातम्या प्रसारित झाल्या आहेत. तसेच जागरूक नागरिक आणि प्रवाशांनी वारंवार बस स्थानक प्रशासनाकडे तक्रारी करून देखील दुर्लक्ष केले जात होते. या सर्व बाबी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अचानक पंढरपूर बस स्थानकाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यामध्ये बस स्थानकातील शौचालय, पिण्याचे पाणी, फलाट, तसेच बस स्थानकाच्या बाहेर आणि आपली बाजूस असलेले व्यापारी गाळे, या ठिकाणी जागोजागी कचरा व घाण साठलेली पाहायला मिळाली. त्यामुळे आमदार समाधान आवताडे चांगलेच संतप्त झाले आणि त्यांनी महामंडळ अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यावेळी आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुख गैरहजर होते. त्यांना आमदार समाधान आवताडे यांनी फोन करून स्वच्छता कंत्राटदार कोण आहे. आणि तो योग्य पद्धतीने त्याचे काम करत नसेल तर त्याच्यावर कारवाई का केली जात नाही असा सवाल केला. त्याचबरोबर बस स्थानक परिसरातील जागोजागी पडलेला कचरा एका आठवड्यात पूर्णपणे स्वच्छ करून घ्या मी पुढच्या आठवड्यात पुन्हा येईन आणि स्वच्छता झाली असल्याची खात्री करेन असे सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत प्रांत अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर शहर चे पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर, परिवहन महामंडळाचे वाहतूक निरीक्षक दळवे, यांच्यासह इतर अधिकारी व आमदार समाधान आवताडे यांचे कार्यकर्ते प्रवासी व बस स्थानक परिसरातील व्यापारी उपस्थित होते.

# भिमाई आश्रमशाळेत राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा स्मृतिदिन साजरा

## राजमाता अहिल्याबाई होळकरांचे कार्य कौतुकास्पद. : नानासाहेब चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आयुष्यभर सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी काम केले. त्यांनी केलेल्या पारदर्शक कारभारामुळे सर्व सामान्यांना न्याय मिळाला असे प्रतिपादन भारत मुक्ती मोर्चाचे प्रदेश कार्याध्यक्ष नानासाहेब चव्हाण यांनी केले.



ते मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा व मुलांचे व मुलींचे अनुदानीत वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलातील आवारात आयोजीत स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी राजमाता अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेस पुष्पहार. तथागत गौतम बुद्ध मूर्तीस व दिवंगत रत्नाकर मखरेंच्या (तात्या) प्रतिमेस पुष्प अर्पण करत संस्थेचे सचिव ॲड. समीर मखरेंनी अभिवादन केले. यावेळी उपप्राचार्या सविता गोफणे, कु. सृष्टी शेंडगे (इ.९ वी) यांनी अहिल्याबाई होळकरांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी कार्यक्रमास संकुलातील प्राचार्या,मुख्याध्यापक,प्राध्यापक,अधीक्षक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# बुलेटची महिलेला पाठीमागून जोरदार धडक; महिला जागीच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळेः भरधाव वेगात असलेल्या बुलेटची पाई चालनाऱ्या महिलेला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने महिला जागीच ठार झाल्याची घटना काल इंदापुर तालुक्यात घडली शालन शिवा काळे (वय वर्ष ५५, रा. शिंगाडे वस्ती ता. इंदापूर जि. पुणे असे बुलेटच्या अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव असुन बुलेट चालक स्वप्निल लहू गोरे (रा. माळवाडी नं. २ ता. इंदापूर) याच्यावर इंदापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत शालन काळे यांचा भाऊ हरी शिवा काळे यांनी इंदापूर पोलीस स्टेशन ला फिर्याद दाखल केली आहे. रविवार (दि. ११ रोजी ) माळवाडी नंबर २ च्या हद्दीत आईस्क्रीम फॅक्टरी जवळ दुपारी साडेतीन वाजता ही घटना घडली आहे. इंदापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार घटनेतील स्वप्निल लहू गोरे याने मोटरसायकल (नंबर एम एच ४३/बी के /८२६४) या लाल रंगाच्या बुलेटने भरधाव वेगाने चालवत. पाई चालत जाणाऱ्या शालन शिवा काळे या महिलेस पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात शालन काळे यांच्या डोक्याला हातापायाला गंभीर मार लागल्याने ती जिगीच ठार झाली. स्वप्निल भाऊ गोरे याचे विरूद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसहिता कलम २८१,१०६ (१) (२),१२५ (ए),



१२५(बी), ३२४ (४) ( ५ ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास इंदापूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार नगराळे करत आहेत.

# संजय जाधव धाराशिव चे नविन पोलीस अधीक्षक, तर अतुल कुलकर्णी यांची सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

धाराशिव/सुधाकर रणदिवे, धाराशिव चे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची सोलापूर ग्रामीण येथे बदली झाली असून बारामतीचे अप्पर पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची धाराशिवच्या नवीन पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था कायम राखणे स्मार्टफोन करण्यासह गुन्हेगारी कमी करून महिलाविषयक गुन्हे उकलण्यात




अतुल कुलकर्णी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वृक्ष लागवड, पर्यावरण, पूरक गणपती, पारधी समाजाच्या मुलांचे पुनर्वसन, व त्यांना नोकरीत संधी असे अनेक उपक्रम कुलकर्णी यांनी राबविले पहाट उपक्रम हा राज्यभर राबविला गेला. बारामती अगोदर चंद्रपूर व श्रीरामपूर येथे गेली बारा वर्ष अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार सांभाळला आहे. लोक सभा निवडणुकीपूर्वी ते बारामती येथे आले होते, चंद्रपूर येथे कार्यरत असताना नक्षली भागात विशेष कामगिरी बजावल्याबद्दल जाधव यांना राज्य शासनाच्या वतीने विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे.

# धनाजी शेळके यांची पी.एस.आय पदी निवड झाल्याबद्दल डॉ. विनय कोरे सावकर यांच्यामार्फत सत्कार

पत्रकार नामदेव निर्मळे

पुनवत (ता.शिराळा) येथील कु.धनाजी महादेव शेळके यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत 'पोलीस उपनिरीक्षक'(पी.एस.आय.) पदी निवड झाल्याबद्दल आमदार डॉ.विनय कोरे (सावकर) यांनी त्याचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी महादेव शेळके,विजय शेळके,दत्तात्रय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



# शहापूर मध्ये बचत गट आणि माविम च्या महिलांचा भव्य संवाद मेळावा मोठया दिमागात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : महिला व बालविकास विभाग,महाराष्ट्र शासन,कायापालट केंद्र किनवली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहापूर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने महिला संवाद मेळाव्या चे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्याला राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ना. अदिती तटकरे उपस्थित होत्या. यावेळी ठाणे जिल्ह्यातील समस्त बचत गट महिला विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) चा तमाम महिला वर्ग उपस्थित होता.सदर मेळाव्या मध्ये शहापूर तालुक्यातील रान भाज्यांचे प्रदर्शन मांडले गेले होते. यावेळी महिला व बाल विकास मंत्री ना. अदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्यातील तमाम महिला वर्गाला महायुती सरकारची भेट आहे आणि ही योजना केवळ एक दोन महिन्यासाठी नाही तर अखंड पणे चालूच राहणार आहे असं म्हटलं आहे. तर महिलांना ऑगस्ट नंतर सुद्धा नाव नोंदणी करता येणार आहे आणि या योजनेचा पहिला हफ्ता १७ ऑगस्ट रोजी देण्यात येणार आहे. बचत गट आणि महिला विकास महामंडळ यांच्या मार्फत अनेक महिलांना रोजगार मिळत आहे, कामे मिळत आहेत. भविष्यात सदर पसारा




अजून व्यापक स्वरूपामध्ये असणार आहे,असं मंत्री तटकरे यांनी म्हटलं आहे.तत्पूर्वी शहापूर चे आमदार दौलत दरोडा यांनी समस्त बचत गट महिला, आशा सेविकां, माविम च्या महिला वर्गाला पेन्शन आणि ग्रॅज्युटी मिळावी अशी मागणी मंत्री महोदयांना केली. यावर सदर प्रस्ताव शासन दरबारी मांडून महिलांना पेन्शन आणि ग्रॅज्युटी मिळवून देण्याचे आश्र्वासन मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहे.या कार्यक्रम मध्ये शहापूर चे आमदार दौलत दरोडा यांनी गेल्या ५ वर्षात आपल्या मतदार संघात पूर्ण केलेल्या कामांची चित्रफीत प्रदर्शित केली. सदर मेळाव्या मध्ये राष्ट्रवादी चे प्रवक्ते आनंद परांजपे, राष्ट्रवादी काँग्रेस चे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत ( भाऊ ) गोंधळे,शहापूर तालुका आमदार दौलत दरोडा,प्रदेश चिटणीस डी. के. विशे सर, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, महिला जिल्हध्यक्ष ठाणे ग्रामीण सौ. कल्पना तारमळे, युवक जिल्हा अध्यक्ष ठाणे चे प्रतीक हिंदुराव,शहापूर तालुका युवक अध्यक्ष दिनेश चंदे, तालुका महिला अध्यक्ष सौ. मोरगे वाडा तालुका अध्यक्ष जयेश शेलार, पालघर जिल्हा महिला व बालकल्याण सभापती सौ. रोहिणी शेलार, शहापूर तालुक्यातील विविध सेल चे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे जिल्हा प्रवक्ते मुकेश दामोदरे सर यांनी केले.

# शाहिरी कार्याबद्दल शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार

## जनतेला आनंद वाटणारा पहाडी शिवशाहीर! : डॉ.श्रीमंत कोकाटे



**सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यापासून चंद्रपूरच्या कोळसा खाणीपर्यंत आणि कोकणातील समुद्रकिनाऱ्यापासून मराठवाड्यातील दुष्काळी भागापर्यंत जाऊन आपल्या डफावरील थाप आणि पहाडी वीररसाच्या गळ्याने मंत्रमुग्ध करणारे शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांना शाहिरी कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन ! –डॉ.श्रीमंत कोकाटे**

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : शिवशाहीर राजेंद्र कांबळे म्हणजे विचारांचे वादळ, प्रतिभासंपन्न रचनाकार, संवेदनशील मनाचा कलाकार, गोरंगरिबांची दुःखं शाहिरीतून मांडणारा उपेक्षितांचा प्रतिनिधी, कोणतीही अपेक्षा न ठेवता विचारांशी प्रामाणिक असणारा लोकशाहीर, आपल्या बुलंद आवाजाने आसमंत दणाणून सोडणारा पहाडी आवाजाचा महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा शिवशाहीर!

शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांचा शाहिरी कार्यक्रम म्हणजे एक पर्वणीच असते. ऐतिहासिक प्रसंग उभा करण्यात त्यांचा हातखंडा आहे. घड्याळाकडे आणि मानधनाच्या पाकिटाकडे न पाहता जीव ओतून कलेवर, विचारांवर आणि श्रोत्यांवर प्रेम करणारा हा शाहीर महाराष्ट्राला लाभलेले महान रत्न आहे. समाजातील अनिष्ट रूढी परंपरा यांचे मिश्किल भाषेत वर्णन करून हसून हसून पोट धरायला लावणारे, शोषण, गुलामगिरीची जाणीव निर्माण करून अंतर्मुख करायला लावणारे आणि परिवर्तनासाठी भूमी नांगरणारे, असे हे शिवशाहीर आहेत.

केवळ आवाजच नव्हे तर शिवराय, फुलें, शाहू ,आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे विचार पोवाड्याच्या माध्यमातून देशभर पहाडी आवाजाने मांडणारे शिवशाहीर राजेंद्र कांबळे हे एक जिंदादिल कलाकार, मुर्दाड माणसामध्येदेखील नवचैतन्य निर्माण भरणारा प्रभावी शाहीर, हसत खेळत राहून लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करणारा आजचा आमचा शाहीर अमर शेख, पिराजी सरनाईक, बाबासाहेब देशमुख म्हणजे शिवशाहीर राजेंद्र कांबळे खुडूस्कर, ते केवळ गायक नाहीत, तर ते विचारवंत आहेत. शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांनी अनेक सामाजिक संघटना ते राजकीय पक्षाच्या स्टेजवर जाऊन शाहिरीच्या माध्यमातून महामानवांचा विचार सांगितला. २००५ साली जिजाऊ रथयात्रेत ११७ दिवस सहभागी सहभागी झाले होते १० मार्च २००५ सावित्रीबाई फुले यांना वंदन करूण पुणे येथील फुले वाड्यातून आम्ही निघालो आसे ही डाक्टर श्रीमंत कोकाटे म्हनाले. पश्रिचम महाराष्ट्र, बेळगाव, कोकण, मुंबई, खानदेश, बऱ्हाणपूर, मराठवाडा, बिदर, विजापूर, विदर्भ इत्यादी भागात महामानावांचे विचार सांगत आम्ही १७ जून २००५ रोजी सिंदखेड राजा येथे जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी पोचलो. त्यावेळी रोज आठ ते दहा वेळा असे ११७ दिवस शाहिरांनी पोवाडे गायिले. त्यादरम्यान लाखो लोकांना मंत्रमुग्ध केले. रात्री कितीही उशीर झाला तरी सकाळी ७ वाजता शाहीर तयार असायचे.

कंटाळा, थकवा,आळस हे शब्द शाहिरांच्या जीवनकोशात नाहीत. सर्वांशी अत्यंत प्रेमाने वागणारे, असे हे शाहीर आहेत. स्वतःच्या दुःखाचे भांडवल न करता सर्वांना सतत आनंद आणि विचार वाटणारा शाहीर. शाहीर भेटले की आनंदी आनंद. मनमुराद हसविणार, समोरच्याला दुःख विसरायला लावणारा. आम्ही सुमारे ५० जन सतत ११७ दिवस एकत्र होतो, पण कधीही भांडण, मतभेद झाले नाहीत. परत जावे असे वाटले नाही, त्याचे कारण शाहिरांचे पोवाडे, गाणी! सतत नाविन्यपूर्ण मांडणी, खेडेकर साहेबांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या रथयात्रेत आम्ही देवानंद कापसे, प्रवीणदादा गायकवाड इत्यादी पूर्णवेळ सहभागी होतो.

शाहीर राजेंद्र कांबळे म्हणजे बदलते प्रवाह, नवे संदर्भ याचे सतत वाचन करून प्रेक्षकांना शाहिरीच्या माध्यमातून भरभरून देणारा शिवशाहीर होय. कठीण संकल्पनांना सहज सुलभ करणारा रचनाकार, केवळ शारीर नव्हे, तर अनेक पोवाड्यांचा निर्माता म्हणजे शिवशाहीर राजेंद्र कांबळे. हे शाहीर पारंपारिक नाहीत. पारंपारिक वाटेने जाणारे नाहीत, तर स्वतःची नवीन वाट निर्माण करणारे आहेत. शाहीरांचे पोवाडे ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होतात. ते महामानवांचा साक्षात इतिहास उभा करतात.

# विद्यार्थ्यांना आमरण उपोषणापासून परावृत्त व्हावे : महासंचालक

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे अंतर्गत अनुसूचित जातीतील एम. फिल तसेच पीएच. डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत त्यांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देते. वर्ष २०१३ पासून वर्ष २०२१ पर्यंत एकूण २२४६ विद्यार्थ्यांना सदर अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कालावधी पूर्ण झाला आहे असे एकूण ७४२ विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन शोध प्रबंध सादर केले आहेत.

शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र. ७७/बांधकामे दिनांक २५ जुलै २०२४ अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-2022 अंतर्गत एकूण ७६३ विद्यार्थ्यांना ५०% टक्के दराने Date of Award पासून सरसकट अधिछात्रवृत्ती मंजुरी करण्यास मान्यता दिली. त्याअनुषंगाने दि. ०५/०८/२०२४ रोजी पासून विद्यार्थी आमरण उपोषणास बसले आहेत. तसेच BANRF-2018 अंतर्गत एम. फिल च्या लाभार्थी विद्यार्थ्यांना पुढे पीएच.डी करिता अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात यावा याकरिता विद्यार्थी दि. १९/०७/२०२४ पासून आमरण/साखळी उपोषणास बसले आहेत. दि. १३/०८/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनेनुसार मा. सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी ऑनलाईन (तउ) द्वारे उपोषणास बसलेल्या विद्यार्थी प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधला व विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने माहिती घेऊन मा. मुख्यमंत्री यांना विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव सादर करणार असल्याचे सदर बैठकीमध्ये माहिती दिली व विद्यार्थ्यांना आमरण उपोषणापासून परावृत्त व्हावे असे महासंचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे,यांनी सांगितले.

# वागदरी जि.प शाळेचं मुख्याध्यापकपदी बाबासाहेब बनसोडे रुजू

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

वागदरी/प्रतिनीधीः अतिशय हुशार आणि प्रामाणिक नियमानुसार काम करणारा व कष्टातुन सावरत जीवन काढणारा.

सुरुवातीला औरंगाबाद जिल्ह्यातून शिक्षक या पदाचा पद स्वीकारले त्या ठिकाणी त्यांच्या हाताखाली शिकलेले विध्यार्थी विविध पदावर रुजु झाले .




नंतर अक्कलकोट तालुक्यात बोरोटी जि.प. मराठी शाळेत शिक्षक म्हणून काम पाहत होते बोरोटी गावातून पदोन्नती बदली म्हणून आपल्या जिल्हा परिषद मराठी मुलींचा शाळा वागदरी गावात मुख्याध्यापक या पदावर कार्यरत आहे हे मला कळताच आनंद झाला म्हणून माझा मित्र श्री महादेव सोनकवडे याच्या सहकार्याने वागदरी गावात नुकताच मुख्याध्यापक म्हणून आलेले श्री बाबासाहेब बनसोडे सरांचे सत्कार करण्याचे नियोजन करण्यात आले सुत्रसंचालन श्री महादेव सोनकवडे हे होते माजी जि.प. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शिवलिंग ल.आसुदे यांच्याकडून श्री बाबासाहेब श. बनसोडे मुख्याध्यापक यांना शाल ,फेटा , हार आणि गुच्छ देऊन करण्यात आले . या कार्यक्रमात श्री महादेव सोनकवडे , ग्रामपंचायत सदस्य श्री श्रीकांत इंडे , अशोक ख्याले , आकाश आष्टे , दिलीप नडगेरी आणि धडाडी नेता श्री श्याम बाबर सहशिक्षिका गिरी मॅडम, फड मॅडम इत्यादी उपस्थिती होते..

सराच्या पुढील वाटचालीस ख शुभेच्छा दिले

# शाळेत विद्युत रोषणाई व तिरंगा सायकल रॅली

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी : डाळिंब येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत हर-घर तिरंगा अभियान अंतर्गत ता.१३ रोजी ध्वजारोहण करून गावात शाळेचे मुख्याध्यापक कोकळगावे अब्दुल कादर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यासहित शिक्षकांनी तिरंगा सायकल रॅली काढून गावकऱ्यांना देशभक्तीचा संदेश दिला. गतवर्षी शाळेत समाज कल्याण कडून एकूण २६ सायकल प्राप्त असून त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी रॅलीसाठी केला.



तसेच गावकऱ्यांच्या सहकार्यातून शाळेवर तिरंगा विद्युत रोषणाई लाइटिंग करून गावात देशभक्ती देशप्रेम जागृत करण्याचा प्रयत्न शाळेकडून केलेला आहे.या अभियानात सेवानिवृत्त विस्तार अधिकारी मोतुलाल शारवाले, माध्यमिक शिक्षक अभिमन्यू गायकवाड, आदर्श शिक्षक शाहूराज हुलगे-माने, केंद्रीय कर्मचारी भरत कांबळे, गटनेते खयुम चाकूरे, शिक्षण तज्ञ रब्बानी पटेल उपस्थित होते.

तसेच याच प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बाबा जाफरी यांनी दहा झाडे लावून वृक्षारोपण केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक धनराज फुरडे, गोविंद जाधव, सुभाष सुरवसे, धनराज भुसार, प्रवीण शिंदे, जमाल पाशा खैराटे, बालाजी कवठे, श्रीमती कुलकर्णी, माने बिराजदार, भोसले, पोद्दार ,सगर, ढेरे व सेवक मल्लिनाथ फुलारी यांनी परिश्रम घेतले.

# अधिकाऱ्यांवर कारवाई न केल्यास उपमुख्यमंत्र्यांच्या निवासस्थाना समोर आंदोलन करु : डॉ. सतिश केदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधीः विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कर्तव्यात कसूर करुन व अधिकाराचा गैरवापर करुन काढून टाकणार्या अधिकार्यांवर कारवाई न केल्यास राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांच्या घरासमोर आंदोलन करु, असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतिश केदारी यांनी दिला,



जेजुरी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढून टाकणार्या अधिकार्यांवर कारवाई करण्यात यावी, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे जेष्ठ नेते माजी आमदार अँड एल टी सावंत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, व रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते पंढरीनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली संबंधित पुरंदरच्या प्रांत वर्षा लांडगे, तहसिलदार विक्रम राजपूत, भोर उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाघचौरे व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता या सर्वांवर कारवाई करण्यात यावी, व विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी सासवड येथील शिवतीर्थावर रिपाइंच्या वतीने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी सतिश केदारी बोलत होते, यावेळी बोलताना केदारी म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढून टाका असे आदेश नसताना देखील , बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल असलेल्या द्वेषातून अधिकाराचा गैर वापर करुन, कर्तव्यात कसूर करुन, संगनमताने कटकारस्थान करुन, संबंधित अधिकाऱ्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा एखादा दगड उचलून टाकावा अशा प्रकारे काढून टाकला आहे, हा पुतळा काढताना , तालुक्यातील राजकीय पक्ष सामाजिक संघटना पत्रकार लोकप्रतिनिधी आंबेडकरी अनुयायी यांना विश्र्वासात न घेता सदर पुतळा काढून टाकला आहे त्यामुळे या सर्व अधिकार्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी केली यावेळी माजी आमदार अँड एल टी सावंत, विष्णूदाद भोसले, शिवसेना ( उबाटा ) गटाचे तालुका प्रमुख अभिजित जगताप, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग व माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव पंढरीनाथ जाधव, यांनी सदर घटनेचा निषेध करुन कारवाई न झाल्यास मा. जिल्हाधिकारी साहेब, ग्रामीण पोलीस अधीक्षक साहेब पुणे जिल्हा यांच्या कार्यालयासमोर आझाद मैदान येथे आंदोलन करु असा इशारा देण्यात आला, यावेळी , नायब तहसीलदार मा. घाडगे रावसाहेब यांना निवेदन देण्यात आले, तसेच मा.जिल्हाधिकारी साहेब पुणे जिल्हा, व मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य सचिवालय पुणे विभाग यांना पत्र देण्यात आले, यावेळी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष दिपक ओव्हाळ, सुभाष सहजराव संघटक सचिव, स्टीवन जोसेफ गोविंद जगताप, पुणे शहर अध्यक्ष, किशोर पंडागळे, पश्रिचम महाराष्ट्राचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, अमर कनोजिया शकुरभाई शेख, अँड .अरुण सोनवणे, बी. आर. कांबळे सोनबा ओव्हाळ, तानाजी भालेराव प्रितम ओव्हाळ, आणणा शिंदे अजय शिंदे, सचिन शिंदे, श्रीधर गायकवाड महेंद्र पोळ, प्रकाश कदम सर्जेराव औचरे रमेश रणदिवे, , यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते, या आंदोलनास काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना उबाठा गट, बहुजन हक्क परिषदेचे सुनिलतात्या धिवार कोडीत खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच विशाल कांबळे, कोल्हाटी डोंबारी संघटनेचे राज्याचे नेते , नानासाहेब ताथवडकर, बहुजन युथ पँथरचे कालीदास उबाळे काँग्रेस पक्षाचे अनिल कांबळे, बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे सुनिल जगताप नामदेव नेटके, सासवड नगरपालिका पथारी संघटनेचे संचालक गुलाबराव सोनवणे आदीवासी महासंघाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय दरेकर, कैलास धिवार, आप्पासाहेब भांडवलकर आदींनी पाठींबा दिला,

# नवीन शैक्षणिक धोरण कौसल्याधिष्टित : डॉ. जाधव




**दैनिक यशसिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांने केवळ नोकरी न करता ज्ञान प्राप्ती म्हणून शिक्षणाकडे बघितले पाहिजे. आजची युवा पिढी हि मोबाईलचा अतिवापर सोशल मिडिया,यात अडकली आहे. यातून त्यांनी बाहेर पडावे. नवीन शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट चांगला माणूस घडविणे हा असून भविष्यात कौधल्याधिष्टित विद्यार्थी निश्रि्चतच घडेल, पण त्यासाठी अभ्यासाबरोबरच तरुणांनी कला, क्रीडा, अभिनय, लेखन, वाचन, आणि विज्ञानाची कास धरावी असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव यांनी केले.क ग दा मोरे निफाड महाविद्यालयात खपर्वीलींळेप झीसीराश/ उद्बोधन कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात बोलत होते.

या सत्राचे उद्घाटक प्रोफे.(डॉ.) भास्कर ढोके म्हणाले की, पुस्तकी ज्ञानासोबतच जीवन व्यवहारातील नानाविध अनुभव मानवास समृद्ध करतात, म्हणून बदलत्या शैक्षणिक पद्धती विध्यार्थांने आत्मसात करून सर्वांगीण विकास साधावा. महाविद्यालयातील विविध उपक्रम व योजना याद्वारे विध्यार्थाने आपल्या क्षमता, कौशल्य ओळखून स्वतःला अद्ययावत करणे काळाची गरज असून नवविचार - कृतीवरच हे शैक्षणिक धोरण आधारलेले आहे.अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम योजनांची माहिती देत उद्बोधन वर्गाचे महत्व विशद केले. विध्यार्थानी विविध सोयी सुविधेचा उपयोग करून स्वयं विकासावर भर द्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमचे प्रास्ताविक डॉ प्रवीण ढेपले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण शार्दुल तर आभार डॉ. सुजाण लॉरेन्सिया यांनी मानले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात सर्व विभागांची माहिती देण्यात आली. यात परीक्षा डॉ. प्रवीण ढेपले,विध्यार्थी विकास प्रा.प्रवीण शार्दुल,रा से यो. प्रा.भाऊसाहेब मुन्तोंडे,सांस्कृतिक डॉ.सुरेखा जाधव,एन.सी.सी. प्रा. शंकर गायकवाड,शिष्यवृत्ती प्रा. हिरामण नेटारे,ग्रंथालय प्रा.एस.डी.आहेर, शारीरिक शिक्षण प्रा.चंद्रशेखर मोरे,मराठी डॉ.सुनिता उफाडे,इंग्रजी डॉ.एल.जे.सुजान ,रुपाली मोहाड , पी.ए.शिंदे कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. महेश बनकर , प्रा.पंकज गांगुर्डे,प्रा.योगेश कडलग,प्रा.एम.एन पवार,डॉ.बी.सी. आहेर,प्रा.अतुल आहेर,श्रीमती वैशाली गीते, सीमा तायडे, पल्लवी खापरे,गोकुळ सानप सोपान मोरे, किरण वाघ,महेश भरते , राहुल जाधव यांनी प्रयत्न केले.

# राज ठाकरे २० पासून विदर्भ दौऱ्यावर

**दैनिक यशसिद्धी न्यूज** अकोला : महाराष्ट्र नवनिर्माण सेना आगामी विधानसभा निवडणूक ही स्वबळावर लढवणार आहे. त्यासाठी मनसेकडून जोरदार मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे स्वतः संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. नुकताच मराठवाडा दौरा राज ठाकरे यांनी केला. यानंतर आता मनसे अध्यक्ष विदर्भ दौरा करणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आता आगामी विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे.